# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 09 / 11 / 2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मोर्शी 545/23 कलम 324, 504 ,506, 34 भादवी | सौ चंदा राजेंद्र लुंगे वय 46 वर्ष रा.मडगे मंगल कार्यालयाच्या मागे मोर्शी | 1. बाळाभाऊ देविदास ठाकरे वय 50 वर्ष जात कुणबी<br>2. तन्मय उर्फ तुषार बाळाभाऊ ठाकरे वय 22 वर्ष दोन्ही राहणार मडगे मंगल कार्यालयाच्या मागे मोर्शी | मडगे मंगल कार्यालया च्या मागे मोर्शी 1 की मी दक्षिण | 08/11/23 चे 18.30 वा.दरम्यान | 08/11/23 चे 21.32 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी व आरोपी हे शेजारी राहणारे असून नमूद घटना . ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे पती हे रोडवर इंधन तोडत असताना आरोपी क्रमांक एक हे शेतातून म्हशी व गाई चराईवरून आला असता त्याने फीच्या पतीला म्हटले की तू माझे वासराला कुराड का मारून फेकली असे विचारले असता त्यावर फीचे पतीने म्हटले की मी कुराड मारून फेकली नाही या कारणावरून आरोपी क्रमांक एक हे फी च्या पतीच्या अंगावर आले व त्यांनी लोंबाझोम्बी करून फीच्या पतीला शिवीगाळ केली म्हणून ती ही मदत करण्याकरीता गेली असता आरोपी क्रमांक एकने त्याच्या हातात असलेली काठी फीच्या डावे हाताच्या पंजावर मारली त्यामुळे हातावर व बोटावर सूज आली तसेच आरोपी क्रमांक दोन तेथे आला व फीच्या पतीला थापडा भुक्क्यांनी मारहाण केली व आरोपी क्रमांक एक ने फी च्या पतीला डाव्या मांडीला व उजव्या टोंगळ्याला काठी मारून जखमी केली व जीवाने मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीसर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 2 | आसेगाव 282/2023 कलम 279,337 भादवी. | ज्ञानेश्वर श्रीरामजी ठाकरे वय 50वर्ष रा. महादेव मंदिर रोड आसेगाव पूर्णा | एसटी बस क्रमांक एम एच 20जी.सी 3831 | आसेगाव ते परतवाडा रोड | 08/11/23 चे 12.00 ते 12.10वा.दरम्यान | 08/11/23 चे 21.09वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की , मी वरील ठिकाणी राहतो व घटना व ता.वेळी माझा पुतण्या व पुतणी हे दिव्यांग असल्याने आमदार बच्चू कडू यांनी दिलेल्या एक काळया रंगाची चार चाकी स्कुटी प्लेट यांनी रोज कॉलेजला जातात .मी व माझी पत्नी शेतात असताना उद्धवराव दिवान यांचा फोन आला की तुमच्या पुतण्याचा आसेगाव ते परतवाडा रोडवर डॉ. बोबडे यांच्या घराजवळ अपघात झाला आहे ते तेथे गेलो असता एसटी बस क्रमांक एम एच 20 जीसी 38 31 व एक काळया रंगाची वेगनार क्रमांक एम.एच46 एक्स 67 88 व माझे स्कुटी चार चाकी गाडी अपघात स्थितीत दिसली एसटी बस ही भरधाव वेगाने येऊन रोडच्या बाजूला असलेल्या विनेगर गाडीवर जोरदार धडक दिली ती विनेगर गाडी माझ्या स्कुटीवर धडकली त्यामुळे आम्ही दोघेही खाली पडलो त्यामुळे आम्हाला डोक्याला छातीला मार लागला असे त्यांनी सांगितले त्यांना ॲम्बुलन्स मध्ये अचलपूर येथे रेफर केले माझ्या पुतण्या व पुतणी हे कॉलेजमधून घरी येत असताना एसटी क्रमांक यांनी भरगाव वेगाने निष्क्रियपणे वाहन चालून विनेगर गाडीला धडक दिली त्यामुळे माझ्या पुतण्याचे स्कुटीला धडक लागली व ते जखमी झाले म्हणून एसटी बस चालका विरुद्ध कारवाई व्हावी म्हणून पोस्टला येऊन |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | रिपोर्ट देत आहेअशा फी च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 3 | नांदगाव 464/2023 कलम 143,447 भादवी सहकलम 11 महाराष्ट्र पुतळ्याचे पवित्र्य भंगास प्रतिबंध अधिनियम 1997 सह कलम 135 महाराष्ट्र पोलीस अधिनियम1 951 | नंद्रू धोंड्र परळकर मुख्याधिकारी नगरपंचायत नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती वय..39 वर्ष ना.खंडेशवर | 1)डॉ.भुषण सजंय पोतदार वय..40वर्ष 2) अविनाश सदाशिव ब्राह्मणवाडे वय .35वर्ष दोन्ही रा.ना.खंडेश्वर जि.अमरावती व इतर अज्ञात 10ते 12 इसम | अमरावती यवतमाळ रोडवरील ना.खंडेशश्वर बसस्टॉन्ड जवळ नगर पंचायतीच्या वतीने उभारण्यात आलेल्या सार्वजनिक ठिकाणावरील जलकुंभ जि.अमरावती | 24/10/23चे 08.00वा. | 08/11/23चे18/49वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील नमूद फिर्यादी यांनी आज रोजी पोस्टेला येऊन लेखी रिपोर्ट दिला की दिनांक 24 /10 /20 23 रोजी सकाळी 08/00 वा. चे दरम्यान अमरावती यवतमाळ रोडवरील नांदगाव खंडेश्वर बस स्टँड जवळ नगरपंचायतीच्या वतीने उभारण्यात आलेल्या सार्वजनिक ठिकाणावरील जल कुंभावर विनापरवानगीने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा 1) डॉक्टर भूषण संजय पोतदार 2) अविनाश सदाशिव ब्राह्मणवाडे दोन्ही राहणार नांदगाव खंडेश्वर ता नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती यांनी इतर अज्ञात दहा ते बारा लोकांची गैरकायद्याचे मंडळी जमवून विनापरवानगीने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला असल्याचे निदर्शनास आले त्यांचे हे कृत्य महाराष्ट्र पुतळे चे पावित्र्य भंगास प्रतिबंध अधिनियम 1997 चे कलम 11 च्या व मा जिल्हाधिकारी जिल्हा अमरावती यांचे आदेश क्रमांक कक्ष-27/ म स-01/ गृह विभाग/37(1), (3) आदेश/ कावी-1182/2023 दिनांक13/10/23 अन्वये तसेच मुंबई पोलीस कायदा 1951 चे कलम 37 (1)(3) चा भंग केलेला आहे अशा फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोस्टेला सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 4 | चांदूरबाजार 704/2023 कलम-279,304 (अ) सहकलम 184,128/177 मो वा का | अविनाश पांडुरंग देशभ्रतार वय 60 वर्ष शिवाजीनगर चांदूरबाजार | मो.सा. क्र. MH 27 DK4285 चे चालक उत्कर्ष वानखडे वय 19 वर्ष चांदूरबाजार | चांदूर बाजार ते वलगाव अमरावती रोड डिस्कवरी बार जवळ 01 किमी दक्षिण | 08/11/23 चे 06/00 ते 07/00 वा दरम्यान | 08/11/ 23 चे 10/41 वा | हकिकत अशाप्रकारे आहे की नमूद घ.ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना त्यांच्या पत्नीने सांगितले की चांदुर बाजार ते वलगाव रोडवर डिस्कवरी बार जवळ ब्लॅक रंगाची पल्सर कंपनीची मोसा MH27 डिके 42 85 चे चालक उत्कर्ष वानखडे यांनी ट्रिपल सीट वाहन चालवून फिर्यादीचे भाऊ दीपक पांडुरंग देशभ्रतार यांना मागून धडक देऊन जखमी केले व स्वतः गाडीखाली पडून जखमी झाला जमलेल्या लोकांनी फिर्यादीचे जखमी भावास सरकारी दवाखाना चांदूरबाजार येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मरण पावल्याचे सांगितले वरून उत्कर्ष वानखडे मो.सा.चालक यांनी आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून माझ्या भावाला मागून धडक मारून जखमी केले व त्यांचे मरणास कारणीभूत झाला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरून वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | शिरजगाव कसबा 384 / 23 कलम 279,304 अ भादवी | भोलु रामरतन अंखडे वय 30 रा रवांग ता. टीमरणी जि. हरदा म.प्र. | अज्ञात | परतवाडा ते बैतुल रोड खरपी जवळील पेट्रोल पंपाचे अलीकडे 13 किमी पश्चिम | 30.10.23 चे 21.30वा | 08/11/2023 चे 17.01 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की , फिर्यादी चा भाउ हा मजुरीचे कामकरीता अकोला येथे गेला होता. मजुरीचे कामवरून परत येत असतांना परतवाडा ते बैतुल रोडवर जेवणाकरीता थांबला असता नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी **Mh29AD5782** ही गाडी बैतुल कडुन येत असतांना गाडीचे चालकाने भरधाव वेगाने व निश्काळजी पणे गाडी चालवुन फि. चे भाउ मृतक नामे कांतीलाल रामरतन अंखडे याला धडक मारून जखमी केली त्याला इलाजाकरीता जिल्हा सामान्य रूग्णालय अमरावती येथे भरती केले असता इलाजादरम्यान तो मरण पावला .अशा फीर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला . |
| 6 | **रहिमापुर 190/2023 कलम 324,504,506,34 भादवी** | **सौ. गायत्री कैलास धारपवार वय 27 वर्ष, , रा. विहीगाव ता. अंजनगाव सुर्जी मो क्र 9922022968** | **1.सौ.अश्विनी अनंता धार पवार वय 28 वर्ष, क्र.2 अनंता गणेशराव धारपवार वय 32 वर्ष दोन्ही रा. विहिगाव ता. अंजनगाव सुर्जी** | **ग्राम विहिगाव उत्तरेस 08 की मी** | **08/11/2023 चे 16/30 वा.ते 17/00 वा दरम्यान** | **08/11/2023 चे 20/37 वा.** | **हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी जबानी रिपोर्ट दिला की, पती कैलास धारपवार वय 2 मुलीसह राहते व घरकाम करते. माझे शेजारी माझे दिर नामे अनंता गणेशराव धारपवार हे त्यांचे पत्नी व मुलासह वेगळे राहत असुन माझी सासु बेबी हया त्यांचे सोबत राहतात. नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी मी पाणी भरत असतांना आरोपी क्र 1 हिचे भांड्यावर पाणी उडाल्याने तिने मला शिवीगाळ केली वरुन मी शिवीगाळ का करत असे म्हटले असता मला माझी अरोपि क्र. 1 ने मागुन हात धरले व आरोपी क्र2 ने माझे डोक्यावर विळा मारला व तो विळा खाली पडल्याने पुन्हा प्लॉस्टीक ड्रमचे झाकन मारले ते माझे कानाजवळ लागुन जखम झाली त्यांनतर दिर व दिरानी यांनी मला शिवीगाळ करुन जिवाने मारण्याच्या धमक्या दिल्या सदर भांडणामध्ये माझी साडी सुध्दा फाटली असल्याने मी पतीसह पोलीस स्टेशनला येवुन जबाणी रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.** |
| 7 | **रहिमापुर .191/2023 कलम 324,504 ,506,34 भादवी** | **सौ. अश्विनी अनंता धारपवार वय 28 वर्ष, रा. विहीगाव ता. अंजनगाव सुर्जी मो क्र 7083401294** | **1.सौ.गायत्री कैलास धारपवार वय 32 वर्ष, क्र.2 कैलास गणेशराव धारपवार वय 34 वर्ष दोन्ही रा. विहिगाव ता. अंजनगाव सुर्जी** | **ग्राम विहिगाव उत्तरेस 08 की मी** | **08/11/2023 चे 16/00 वा दरम्यान** | **08/11/2023 चे 21/12 वा.** | **हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी जबानी रिपोर्ट दिला की, रोजी दुपारी 16/00 वा सुमारास मी दिवाळी निमीत्य घरातील भांडे घासुन आंगणात वाळु घातले तेव्हा माझी जेठाणी आरोपी क्र.1 ने माझे भांडयावर टाकीतील पाणी फेकुन माझे भांडे खराब केल्याने मी तिला पाणी का फेकले असे म्हटले असता जेठाणी गायत्रीने मला शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली व तिने फोन केल्याने तिचे पती आरोपी क्र 2 हे घरी आले व त्यांनी कोणतीही विचारपुस न करता मला, माझे पतीला व सासुला शिवीगाळ करून जिवाने ठार मारण्याची धमकी दिली आम्ही सर्व त्यांना शिवीगाळ करु नका** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | असे म्हणत असतांना त्यांनी कु-हाड हातात घेवुन माझे पतीला मारली त्यामुळे माझे पतीचे पायावर जखम झाली आहे मी<br>सोडवायला गेली असता मला सुध्दा कु-हाडीचे दांडयाने पायावर मारहान केली व सासुला सुध्दा कु-हाड मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 8 | अंजनगाव सुर्जी 674/2023 कलम 279,337, 338, 304 ( a) भादवी | सिताराम झोरे बारस्कर वय 50 वर्ष रां गाढवा ता जि बैतूल मध्य प्रदेश मो न 8305380891 | श्रावण सिताराम बारस्कर वय 28 वर्ष | अंजनगाव ते परतवाडा रोडवर ग्राम पांढरी जवळील शहानुर फाटा | 03/11/23 चे रात्री 22/00 वा सुमारास | 08/11/23 चे 16/38 वा | हकिकत अशा प्रकारे आहे मी समक्ष की सिताराम झोरे बारस्कर वय 50 वर्ष धंदा मजुरी जात कोरकु राहणार गाढवा जिला बैतूल मध्य प्रदेश मी समक्ष पोलीस स्टेशनला येऊन जबांनी रिपोर्ट देतो की वरील ठिकाणी राहत असून मजुरीचे काम करतो मला एक मुलगा असून त्याचे नाव श्रावण सिताराम बारस्कर वय 28 वर्ष रा गाढवा जी बैतूल तो मजुरी निमित्त गावोगावी फिरत असतो त्याच्याकडे स्वतःच्या मालकीची शाईन कंपनीचे मोटरसायकल असून तिचा क्रमांक mp 48-n 7343 असा आहे ते मोटरसायकल तो येना जाण्याकरता वापरतो माझा मुलगा श्रावण बारस्कर हा अंदाजे एक महिन्यापूर्वी थ्रेशर मशीन मालक रवींद्र शिंगणे याच्याकडे लाखनवाडी कोकर्डा येथे स्टेशन मशीन वर काम करण्यास आला होता दी .03/11/202 श्रावण याला दारूचे व्यसन होते व दारूचे नसेल मोटरसायक भरधाव वेगाने चालवून एक्सीडेंट झाले यात स्वतः श्रावणची चूक आहे असे असे श्रावण याचे वडिलांनी सांगितले. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण

करीता